MHSN030015242024

**<u>म.सं.कौ.हिं.का अर्ज नं.७६/२०२४ मधील नि.क्र.५ खालील आदेश</u>**

(रिजवाना निहाल मुजावर व इतर वि. निहाल इकबाल मुजावर व इतर)

प्रस्तुत अर्ज अर्जदारांनी घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करणारा कायदा कलम २३ अन्वये अंतरिम पोटगी मिळणेकरिता केला आहे.

२. त्यातील अर्जदाराच्या थोडक्यात कथनानुसार अर्जदार व जाबदार यांचा विवाह दिनांक १२.०५.२०१६ रोजी नांद्रे, जि. सांगली येथे मुस्लीम धर्मशास्त्र रितीरिवाजानुसार झाला आहे. जाबदार क्र. २ ही अर्जदार क्र. १ ची सासू आहे. सदर लग्न संबंधातून त्यांना अर्जदार क्र. २ इजान याचा जन्म दिनांक १०.०३.२०१७ रोजी झाला आहे. अर्जदार व जाबदार क्र. १ यांच्यातील लग्नसंबंध आजही अस्तित्वात असून जाबदार क्र. १ यांनी देखील त्यांचे व दोन्ही अर्जदारांशी असलेले नाते मान्य केले आहे.

३. लग्नानंतर अर्जदार यांना सहा महिने जाबदारांनी चांगले नांदविले. त्यानंतर जाबदार क्र. १ हे दारुच्या व्यसनातून अर्जदार क्र. १ ला त्रास देवु लागले. जाबदार क्र. २ यांनी देखील जाबदारांचे कान भरले त्यामुळे अर्जदारच्या सासूमध्ये वाद होवुन भांडणतंटा वाढु लागला. अर्जदारच्या नातेवाईकांनी व जाबदारांनी चर्चा करुन जाबदार क्र. १ व अर्जदार यांनी जाबदार क्र. २ पासून ऑक्टोबर २०१७ पासून स्वतंत्र राहून संसार करायचे ठरले. मात्र जाबदार क्र. १ ने वेगळे राहिल्यावर अजून त्रास देण्यास सुरुवात केली व अर्जदारांना बेदम मारहाण केली. अर्जदार हिने याची तक्रार पोलिसांकडे केली असता जाबदारांनी राजकीय हस्तक्षेप करुन प्रकरण मिटवले. माहेरी परिस्थिती गरिबीची असल्याने सर्व त्रास सहन करुन अर्जदारने संसाराचा प्रयत्न केला. मात्र जाबदार यांच्या वर्तणुकीत बदल झाला नाही. सन

२०२० मध्ये रमजान सणाच्या वेळी जाबदार क्र. १ यांनी अर्जदारांना मारहाण करुन जबरदस्तीने घराबाहेर काढले व पुन्हा कागल येथे आलीस तर जिवंत ठेवणार नाही अशी धमकी दिली.

४. तेव्हापासून आजतागायत अर्जदार ही मुलासह माहेरी राहत आहे. दरम्यानच्या काळात जाबदारांनी अर्जदारांच्या पालनपोषणाची, औषधोपचाराची, कपडेलत्त्याची जबाबदारी घेतलेली नाही. तसेच अर्जदार क्र. २ याच्या शिक्षणाकरिता कोणतीही तरतुद केलेली नाही. त्यामुळे अर्जदारांना अश्रिताचे जीवन जगावे लागत आहे.

५. अर्जदारांनी दिनांक २६.०६.२०२१ रोजी जाबदारांना नोटीस पाठवून स्वतःकरिता दरमहा रुपये दहा हजार व अर्जदार क्र. २ करिता दरमहा रु.५,०००/– पोटगी मागितली. त्याला उत्तर म्हणून जाबदारांनी दिनांक ०७.०७.२०२१ रोजी व दिनांक ०७.०९.२०२१ रोजी उत्तरी नोटीस देवुन घटस्फोटाची भाषा केली. त्यामुळे नाईलाजस्तव प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

६. जाबदार क्र. १ हे कागल शुगर फॅक्टरीमध्ये काम करत असून त्यांना महिना रु.८०,०००/– ते रु.१,००,०००/– इतका पगार आहे. कागल येथे त्यांची घर मिळकत व प्लॉट आहे. जाबदार क्र. १ यांचा चिकन ६५ चा व्यवसाय आहे. अशा प्रकारे, त्यांचे एकुण मासिक उत्पन्न रु.१,००,०००/– ते रु. १,५०,०००/– इतके आहे. जाबदार क्र. २ घरगुती बिर्याणीची ऑर्डर घेण्याचा व्यवसाय करतात. त्या कोणत्याही प्रकारे जाबदार क्र. १ वर अवलंबुन नाहीत. अर्जदारांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ प्रमाणे पोटगीचा अर्ज दाखल केला आहे. तसेच सदर अर्जाद्वारे देखील पोटगीची स्वतः जाबदार क्र. १ व २ यांच्याकडून दरमहा रक्कम रु. ४०,०००/– इतक्या पोटगीची मागणी करत आहेत.

७. प्रस्तुत प्रकरणामध्ये जाबदार हजर झाले व त्यांनी हया अर्जास त्यांचे म्हणणे नि.क्र.१० वर दिले आहे. जाबदार यांनी अर्जदारांशी त्यांचे नाते मान्य केले आहे व इतर सर्व मजकुर नाकारला आहे. जाबदार यांचे म्हणणे असे आहे की, लग्नानंतर केवळ महिनाभर अर्जदार या व्यवस्थित राहिली. तिने घरातील कोणतीही जबाबदारी घेतलेली नाही. तसेच जाबदार क्र. २ यांचा पाणउतारा करत होती. अर्जदारास माहेरचा ओढा असल्यामुळे सतत माहेरी जायची. अर्जदार व माहेरची आर्थीक परिस्थितीची तुलना करुन जाबदारास हिणवायची. तरीही तिच्या गरोदरपणात जाबदार यांनी तिची पुर्ण काळजी घेतली. दरम्यान अर्जदारच्या घरचे तिला फोनवर अथवा प्रत्यक्ष भेटून शिकवत असल्याचे जाबदारांच्या लक्षात आले. अर्जदार क्र. २ चा जन्म झाल्यावर अर्जदारांना भेटण्यासाठी गेले असता तिने जाबदारांचा पाणउतारा केला आहे.

८. जाबदार क्र. २ यांनी ही परिस्थिती पाहून घरातील सर्व कामे करुन संसारास हातभार लावण्याकरिता मेसचे डबे करुन देण्यास सुरुवात केली. तसेच मुलगी नसल्यामुळे त्यांनी अर्जदार क्र. १ चे कौतुक केले व हट्ट पुरविले. जाबदार क्र. २ यांचे अर्जदार व जाबदार क्र. १ यांच्या लग्नापुर्वी हृदयाचे ऑपरेशन झाले होते. जाबदार क्र. २ यांची तब्येत दरम्यानच्या काळात बिघडल्याने डॉक्टरांनी त्यांना पुन्हा ऑपरेशन करण्याचा सल्ला दिला तेव्हा अर्जदार क्र. १ यांनी जाबदार क्र. १ ला ऑपरेशनवर खर्च करायचे नाही असा निक्षुण सांगितली. तसेच जाबदार क्र. २ ची जबाबदारी घ्यायला लागू नये म्हणून भांडण केले. या संदर्भात अर्जदार व जाबदार यांच्या नातेवाईकांची बैठक झाली त्यामध्ये अर्जदारच्या नातेवाईकांनी आडदांडपणे भांडण काढले. त्यामुळे अर्जदार क्र. २ चा विचार करुन व जाबदार क्र. २ यांना त्रास होवु नये म्हणून जाबदार क्र. २ यांना विभक्त राहण्यास भाग पाडले. जाबदार क्र. २ ही कोल्हापूर येथे भाडयाने राहण्यास गेली. पण दुस–याच महिन्यात तिची तब्येत जास्त बिघडल्याने कोल्हापूरच्या घर मालकांनी तिला घर सोडण्यास सांगितले. पण ही बाब अर्जदार हिस आवडली नाही व ती रागाने माहेरी निघुन गेली आणि जाबदार क्र. २ घराबाहेर गेल्यावरच येईन

असे दरडावले. त्यामुळे जाबदार क्र. २ कागल येथे आठ दिवसांनी भाडयाने राहु लागली. जाबदार क्र. २ चा ऑपरेशनचा सर्व खर्च हा त्यांनी स्वतःच्या बचतीतून केला आहे.

९. अर्जदार यांनी माहेरच्या लोकांचे ऐकून सन २०२० मध्ये रमजान सणाचे निमित्त करुन स्वतःच्या सर्व चीज वस्तू दागदागिने, कपडेलत्ते घेवुन अर्जदार क्र. २ सह माहेरी निघुन गेली आहे. जाबदारांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या ती नांदण्यास यावी म्हणून प्रयत्न केले पण त्यांना अपयश आले होते. अर्जदार व त्यांच्या माहेरीच्या लोकांना कंटाळुन जाबदारांनी दिनांक २२.०२.२०२१ रोजी त्यांच्याविरुध्द कागल पोलिस ठाण्यात तक्रार अर्ज दिला. तसेच सांगली येथील महिला मंडळामार्फत अर्जदारने नांदण्यास यावे म्हणून देखील प्रयत्न केले आहेत. मात्र अर्जदार हिने दिनांक २६.०६.२०२१ रोजी वकीलामार्फत खोटी नोटीस पाठवून पोटगीची मागणी केली. जाबदार यांनी दिनांक ०६.०७.२०२१ रोजी उत्तरी नोटीस पाठवून तिला नांदण्यास येण्याकरिता कळविले. तथापि, अर्जदार नांदण्यास आली नाही. तसेच अर्जदाराने जाबदार क्र. २ यांच्या दिराला हाताशी धरुन जाबदार क्र. २ हिला घराबाहेर काढण्याचा कट रचून विनाकारण त्रास देवुन धमक्या देवू लागले. म्हणून जाबदार क्र. २ हिने दिनांक २२.०२.२०२१ रोजी तक्रार अर्ज दिला. जाबदार क्र. २ यांना अर्जदार यांनी मोबाईलवर शिवीगाळ केल्यामुळे दिनांक १६.०८.२०२१ रोजी कागल पोलिस ठाणे येथे ३४७/२०२१ ही भारतीय दंड विधान कलम ५०७ प्रमाणे एन.सी दाखल केली आहे. अर्जदार यांनी नांदण्यास नकार दिल्यामुळे जाबदारांनी दिनांक १३.१०.२०२१ रोजी त्यांना घटस्फोटाची नोटीस पाठविली आहे. त्याचे अर्जदारने आजतागायत उत्तर दिलेले नाही. दरम्यान सांगली येथे फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ३७२/२०२१ हा फौ. प्र.सं कलम १२५ अन्वये दाखल केला आहे. ते काम आज न्यायप्रविष्ट आहे.

१०. अर्जदारांनी जाबदार हे अल्पशिक्षित असल्याने त्यांच्या तुटपुंज्या उत्पन्नावर काटकसर करावी लागत असल्याने कोणतेही कारण नसताना जाबदाराचा त्याग केला आहे.

त्यांना आपल्या मुलाशी भेटु व बोलू देत नाहीत. या सततच्या मानसिक त्रासामुळे जाबदार क्र. १ याला सात वर्षापासून फिटस्चा त्रास होत आहे व औषधोपचार घ्यावे लागत आहेत. त्याचा परिणाम त्याच्या कामावरही झाला आहे. तसेच कारखाना बंद पडल्यामुळे मिळेल ते काम करुन त्याला जीवन जगावे लागत आहे. तरी देखील जाबदारास अर्जदार सोबत मुलाच्या भविष्याचा विचार करुन संसार करण्याची इच्छा आहे. तो तिच्या माहेरी नांद्रे येथे राहण्यास तयार आहे.

**११.** जाबदार क्र. १ याचे स्वतःचे घर नसून त्यांचे राहते घर शहिद मुजावर यांचे आहे. जाबदार रोजंदारीवर काम करतो. तसेच जाबदार क्र. २ हिचे दोन वेळा ह्दयाचे व कॅन्सरचे ऑपरेशन झाले आहे ती बिर्याणी वगैरेच्या घरगुती ऑर्डर घेते व तिला मृत पतीची दरमहा रुपये १५००/– पेन्शन मिळकत असून त्यातुन औषधोपचाराचा खर्च चालविते. अशा परिस्थितीत केवळ जास्तीत जास्त पोटगीच्या हव्यासायापायी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला असून तो फेटाळण्यात यावा अशी मागणी केली आहे.

**१२.** अर्जदार व जाबदारांच्या म्हणण्याचे बारकाईने अवलोकन केले. दोन्ही बाजुंच्या सन्माननीय विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर मी खालील मुद्दे व त्यांच्या निष्कर्षाप्रत आले आहे. सदर मुद्दे व त्यावरील निष्कर्ष व त्याची कारणमिमांसा मी खाली विस्तृतरित्या मांडत आहे.

| अ. क्रं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे जाबदारकडून कौटुंबिक हिंसाचार झाला, हे सिध्द करतात काय ? | होकारार्थी. |
| २. | अर्जदार हे मागणी केल्याप्रमाणे अर्जाचा निकाल लागेपर्यंत अंतरिम पोटगीस पात्र आहेत काय ? असल्यास रक्कम किती ? | होय, अर्जदार क्र. १ व २ यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रुपये ३,०००/–(तीन हजार मात्र). |

| | | |
|---|---|---|
| ३. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करिताः–**

**१३.** इथे प्रथमतः हे पाहणे गरजेचे आहे की अर्जदार व जाबदार हे 'कौटुंबिक संबंध' या व्याख्येत बसतात का? प्रस्तुत प्रकरणात अर्जदाराच्या कथनानुसार तिचा व जाबदार यांचा विवाह दिनांक १२.०५.२०१६ रोजी झालेला आहे व सदर विवाहातुन त्यांना इजान हा मुलगा आहे. जाबदार यांनी देखील विवाहबाबतचे कथन तसेच मुलाचे पितृत्व मान्य केले आहे. आतापर्यंत त्यांचे लग्न कायदयाने अस्तित्वात आहे. वरील सर्व चर्चेचे अवलोकन केल्यानंतर असे लक्षात येते की, अर्जदार व जाबदार हे विवाहाने एकमेकांशी जोडलेले असून ते कौटुंबिक संबंध या व्याख्येत येतात.

**१४.** अशाप्रकारे अर्जदार व जाबदार यांचा विवाह कौटुंबिक संबंध शाबीत झाल्यावर हा प्रश्न उभा राहतो की, अर्जदार यांचेवर जाबदारांकडून कौटुंबिक हिंसाचार झाला आहे का ? या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी अर्जदाराच्या अर्जातील तक्रारी वजा नमूद केलेल्या काही घटनांचा विचार करणे गरजेचे आहे. प्रस्तुत अर्जाच्या या टप्प्यावर प्रथमदर्शनी फक्त कौटुंबिक हिंसाचार झाला आहे का? हे पाहणे गरजेचे आहे. आत्ता त्यासाठी पुराव्याचा विचार करणे अपेक्षित नाही.

**१५.** अर्जातील कथनानुसार अर्जदारने तिच्यावर घरगुती हिंसाचार झाल्याचे कथन केले आहे. तर जाबदार यांच्या म्हणण्यानुसार अर्जदारांनी पत्नी म्हणून कोणतेही कर्तव्य निभावलेले नाही. तसेच सन २०२० मध्ये रमजानच्या सणाला त्यांना मुलासह घराबाहेर काढले आहे. तसेच अर्जदारच्या सांगण्यावरुन जाबदाराने त्यांचा शारिरीक व मानसिक छळ केला आहे. तसेच दारुच्या नशेत त्यांना मारहाण केली आहे. त्या संबंधात पोलिस ठाण्यात त्यांनी तक्रार दाखल केली होती. तसेच जाबदारांना नोटीस पाठवुन पोटगीची मागणी केली होती. जाबदार यांच्या कथनावरुन देखील सन २०२० पासून अर्जदार मुलासह विभक्त् राहत

असल्याची बाब समोर येते. तसेच त्याने घटस्फोटाची बोलणी करण्याकरिता अर्जदारांना नोटीस पाठविल्याचे देखील दिसून येते. तसेच त्यांच्यामध्ये झालेला समेटाचा प्रयत्न देखील यशस्वी झाल्याचे दिसून येत नाही. अर्जदारने फौ. प्र . सं कलम १२५ अन्वये देखील पोटगीचे प्रकरण दाखल केले असून ते प्रकरण अदयाप प्रलंबित असल्याचे दिसून येते. त्यावरुन सकृतदर्शनी तरी अर्जदारांनी जाबदार यांना घराबाहेर अर्जदार व जाबदार विभक्त राहत असल्याची बाब दिसून येते. तेव्हापासुन जाबदारांनी त्यांच्या पालनपोषणाचा खर्च केल्याचे दिसुन येत नाही. अर्जदारने पोटगीकरिता त्यांना नोटीस पाठविल्याचे व कौटुंबिक न्यायालात प्रकरण दाखल केल्याची बाब अभिलेखावर आलेली आहे व अदयाप तरी तिला पोटगी मंजूर झालेली नाही ही बाब दोनही पक्षांनी मान्य केली आहे. त्यामुळे केवळ अभिलेखावरील कथनांचे अवलोकन करुन असे म्हणता येईल की, जाबदार यांचेकडून अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार झालेला आहे. अशाप्रकारे मुद्दा क्र.१ च्या बाबतीत मी होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

<u>मुद्दा क्र.२ करिताः–</u>

१६. प्रस्तुत प्रकरणात वरील सर्व चर्चेचे अवलोकन केल्यानंतर असे लक्षात येते की, अर्जदार व जाबदार यांच्यामध्ये अनेकवेळा वाद झालेला असुन त्यांच्यामध्ये मध्यस्थीचे देखील प्रयत्न झाले आहेत. जाबदारांचे म्हणणे आहे की, अर्जदारांनी अगोदरच फौ. प्र. सं कलम १२५ अन्वये पोटगी मागितल्यामुळे सदरचा अर्ज चालण्यास पात्र नाही. मात्र महिलांचे कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायदा आणि फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये पोटगी मिळण्याचा अर्ज या दोनही भिन्न प्रक्रिया आहेत व त्या अन्वये पोटगी मंजूर करण्याचे निकष देखील वेगवेगळे आहेत. अर्जदार दोनही कायदयाअंतर्गत पोटगीची मागणी एकाच वेळी करु शकते. त्यामुळे सदरचा अर्ज केवळ या कारणाकरिता चालण्यास पात्र नाही असे म्हणता येणार नाही.

१७. आता प्रश्न असा आहे की, अर्ज प्रलंबित असताना अर्जदार ही मासिक पोटगी मिळणेस पात्र आहे किंवा कसे. मुद्दा क्र. १ मधील विवेचनाच्या अनुषंगाने अर्जदार व जाबदार हे आजही कायदयाने पती पत्नी आहेत. त्यामुळे अर्जदारच्या पालनपोषणाची दैनंदिन गरजांची, औषधोपचारांची व अर्जदार क्र. २ च्या शिक्षणाची जबाबदारी जाबदार क्र. १ ची आहे. सन

२०२० पासून ते विभक्त राहत आहेत व दरम्यान जाबदारांनी पोटगी जबाबदारी उचलली अथवा त्याची तयारी दर्शविल्याचे अभिलेखावर आलेले नाही. आजही जाबदाराच्या कथनानुसार तो अर्जदारासोबत नांदण्यास तयार आहे त्यावरुनच त्याने अर्जदारांची जबाबदारी स्वीकारण्याची तयारी दर्शविल्याचे स्पष्ट होते. म्हणूनच अर्जदार ही जाबदाराकडून पोटगी मिळण्यास पात्र आहे ही बाब सिध्द होते.

**१८.** आता पोटगीच्या रक्कमेचा विचार करता अर्जदारच्या म्हणण्याप्रमाणे जाबदार हा कागल येथील साखर कारखान्यात नोकरीस असून त्याला रु. ८०,०००/– ते रु. १,००,०००/– इतका पगार आहे. मात्र तिने जाबदाराचे शिक्षण किती, त्याचा हुद्दा काय याबाबत कोणताही खुलासा केलेला नाही. त्याच्या पगाराची पुष्टी देणारा कोणताही कागदपत्र अभिलेखावर दाखल नाही. या उलट जाबदार याने तो दहावीपर्यंत शिकला असून तो रोजंदारीवर काम करतो व साखर कारखाना बंद झाल्याने तेथे नोकरीस नाही असे कथन केले आहे. यावरुन जाबदार हा रोजंदारीवर पैसे मिळवतो ही बाब तरी स्पष्ट होते.

**१९.** उपरोक्त विवेचनावरुन अर्जदार क्र. १ व २ हया अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहेत. अर्जदार क्र. २ चे सध्याचे वय पाहता तो प्राथमिक शिक्षण घेत असल्याचे दिसुन येते. त्यांच्या शिक्षणाचा, कपडेलत्ताचा, औषधोपचाराचा खर्च व पोलनपोषणाचा खर्च पाहता अर्जदार क्र. २ याला दरमहा रु.३,०००/– पोटगी मिळणे संयुक्तिक ठरेल. तर अर्जदार क्र. १ हिला अंतरिम पोटगी म्हणून दरमहा रु.३,०००/– हे अर्जाच्या दिनांकापासून देणे उचित राहिल असा निष्कष मी काढत आहे. त्यामुळे मुद्दा क्र. २ चे उत्तर मी होकारार्थी देत आहे.

<u>मुद्दा क्र.३ करिताः–</u>

**२०.** मुद्दा क्र.१ व २ च्या आलेल्या निष्कर्षावरुन मुद्दा क्र.३ करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. जाबदार यांनी अर्जदार क्र. १ व २ यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रुपये **३,०००/– (तीन हजार मात्र)** अंतरिम पोटगी म्हणून अर्जाच्या दिनांकापासुन ते मूळ अर्जाचा अंतिम निकाल लागेपर्यंत दयावेत.

३. प्रस्तुत आदेश मूळ अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत अथवा पुढील आदेशापर्यंत लागू राहिल.

४. प्रस्तुत आदेशाची प्रत दोन्ही पक्षकारांना विनामूल्य देण्यात यावी.

५. प्रस्तुत आदेशाची प्रत संबंधित पोलीस ठाणे अधिकारी यांना तसेच संरक्षण अधिकारी व सेवा प्रदाता यांना कौटुंबिक हिंसाचाराच्या कलम २४ अंतर्गत पाठविण्यात यावी.

६. अर्जाचा खर्च मूळ अर्जासोबत.

VEDVATI ANIRUDHA ADYA

Digitally signed by VEDVATI ANIRUDHA ADYA
Date: 2026.03.10 11:36:52 +0530

सांगली. (वेदवती अनिरुध्द आदय)

दिनांक ०७.०३.२०२६ ३ रे सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सांगली.

## C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | A.P. Patil (Grade-3) |
| Court | : | V.A Adya, J.M.F.C. Court No.3, Sangli. |
| Date | : | 07.03.2026 |
| Order signed by the Presiding officer on | : | 10.03.2026 |
| Order uploaded on | : | 10.03.2026 |